दै. पुण्य नगरी ①

# मनपा निवडणूक : सतरा उमेदवारी अर्ज दाखल

नांदेड/विष्णुपुरी /प्रतिनिधी

नांदेड वाघाळा महानगरपालिका निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पाचव्या दिवशी ऑनलाईन पध्दतीने नांदेड शहर, सिडको, कौठा प्रभागातून सतरा जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

नांदेड शहरातील प्रभाग क्रमांक ११ ड मधून मोहम्मद अकबर मोहम्मद गौस व प्रभाग क्रमांक १२ अ मधून नवीदखान पठाण जफर अलीखान यांनी बुधवारी अर्ज दाखल केले आहेत. तेथेच मनपा निवडणूक कार्यालय सिडकोत पाचव्या दिवशी प्रभाग क्र १९ कौठा प्रभागातील जागांसाठी अकरा जणांनी तर प्रभाग क्र २० सिडकोमधून चार जणांनी ऑनलाईन अर्ज दाखल केले आहेत. यात ॲड.संदीप पाटील चिखलीकर यांनी ऑनलाईन अर्ज दाखल केला असला तरी सत्यप्रतीसह कार्यालयात अर्ज दाखल केल्यानंतर तो अधिकृत धरला जाणार आहे. पितृपक्ष व अमावस्येमुळे उमेदवारांनी हे पाच दिवस अर्जच दाखल केले नव्हते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दि २१ पासून सुरुवात होईल अशी शक्यता आहे.

दै. प्रजावाणी ②

# चार दिवसांत केवळ ९ अर्ज

## पितृपक्ष संपल्यामुळे उमेदवारांची आजपासून झुंबड

नांदेड, दि.२०: महापालिका निवडणुकीकरीता उमेदवारी अर्ज भरण्याचा कालावधी सुरू होऊन चार दिवस लोटले असले तरी आतापर्यंत केवळ नऊ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. आणखी तीन दिवस अर्ज भरण्यासाठी कालावधी शिल्लक असून पितृपक्ष संपल्यामुळे उद्या गुरुवारपासून (दि.२१) उमेदवारांची झुंबड उडणार आहे. घटस्थापनेचा मुहूर्त असल्याने बरेच उमेदवार आपला एक आगाऊ अर्ज ऑनलाईन स्वरुपात दाखल करून ठेवण्याच्या बेतात आहेत.

गेल्या शनिवारी (दि.१६) उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला. दि. १६ ते २० दरम्यान अनुक्रमे १, ४, २ व २ याप्रमाणे एकूण ९ अर्ज दाखल झाले आहेत. एका उमेदवाराने दोन वेगवेगळ्या प्रभागात अर्ज दाखल केला आहे. येत्या २३ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र स्वीकारले जाणार असून यावेळेच्या आत राजकीय पक्षाच्या उमेदवारांना पक्षाच्यावतीने दिलेल्या अधिकृत उमेदवारीचे बी-फॉर्म दाखल करावे लागणार आहेत. ऑनलाईन स्वरुपात

•पान २ वर

दै. मराठवाडा नेता ③

# अमावस्येच्या भितीने अर्ज दाखल करणे टाळले

नांदेड/प्रतिनिधी - महानगरपालीकेसाठी रणसंग्राम सुरु आहे. मात्र पितृपक्षामध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्यास प्रारंभ झाला असल्याने या दरम्यान इच्छुकांनी उमेदवारी अर्ज भरण्याकडे पाठ फिरविली. पितृ पक्षाच्या धसका संपल्यानंतर बुधवारी सर्वपित्री अमावस्याच्या दिवशीही इच्छुकांनी उमेदवारी अर्ज भरणे टाळले. पुरोगामी म्हणविणाऱ्या राजकीय पक्षाच्या उमेदवारांसह अपक्षांनीही अमावस्येचा मुहूर्त टाळल्याने भावी नगरसेवक अंधश्रध्देला खतपाणी घालत असल्याचे चित्र दिसत आहे.

११ ऑक्टोबर रोजी महापालिकेसाठी मतदान आहे. उमेदवारी दाखल करण्याची २३ सप्टेंबर शेवटची तारीख आहे. आज २१ सप्टेंबर असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी केवळ दोन दिवस उरले आहेत बुधवारी प्रभाग क्र. ११ ड मधुन महम्मद अकबर महम्मद गौस यांनी तर प्रभाग क्र. १२ अ मधुन पठाण नविद खान जफर अली खान यांनी उमेदवारी दाखल केली आहे. असे केवळ दोनच अर्ज आले आहेत. भाजप, कॉंग्रेस, शिवसेना व राष्ट्रवादी या प्रमुख राजकिय पक्षांनी अद्याप उमेदवार यादी जाहीर केलेली नाही. भाजप, शिवसेनेच्या मुलाखती कालच आटोपल्या आज गुरुवारी घटस्थापनेच्या मुहूर्तावर सर्वच पक्षाच्या उमेदवार याद्या जाहीर होण्याची शक्यता असल्याने कार्यकर्त्यांची उत्सुकता शिगेला पोहचली आहे. निवडणुक प्रक्रिया १६ सप्टेंबर रोजी सुरु झाली. मतदानासाठी आता केवळ २० दिवस उरले आहेत. अजुनही राजकिय पक्षांनी उमेदवार यादी जाहीर न केल्याने इच्छुकांमध्ये राजकीय अस्वस्थता पसरल्याचे दिसुन येत आहे. २० सप्टेंबर पुर्वीच सर्वच राजकीय पक्षांची उमेदवार यादी जाहीर होईल असा अंदाज पुढाऱ्यांकडुन वर्तविण्यात आला होता. मात्र तसे झाले नाही. त्यामुळे एक एक दिवस पुढे रेटने इच्छुकांना मोठे कठीण वाटत आहे पक्षाचे तिकीट मिळाले नाही तर बंडखोरीची शक्यता असते, त्यामुळे अशा बंडखोरांना मोर्चेबांधणीसाठी वेळ मिळु नये यासाठी सर्वच राजकीय पक्ष शिलकानेच उमेदवारांची यादी जाहीर करीत असावेत, असा ही अंदाज वर्तविण्यात येत आहे.

अमावस्येला कुठलेही शुभ काम सुरू करू नये. या दिवशी काम होत नाही, यश मिळत नाही, कामात अडथळे येतात, धोके असतात. असे अनेक गैरसमज आहेत. अनेकजण अमावस्येला घरातुन बाहेरचाही देखील जात नाहीत यामुळेच की काय, बुधवारी सर्वपित्री अमावस्या असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्याकडे इच्छुकांनी पाठ फिरविली.

दै. पुण्य नगरी ④

# मतदान जनजागृतीसाठी आज सहविचार सभा

नांदेड / प्रतिनिधी



नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सार्वत्रिक निवडणूक २०१७ साठी मतदान ११ ऑक्टोबर २०१७ रोजी होणार असून शहरातील मतदारामध्ये जागृती होऊन जास्तीत जास्त संख्येने मतदानासाठी बाहेर पडावे आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मतदार असून त्यांचा सहभाग मतदार जागृतीसाठी व्हावा व निवडणुकीमध्ये शंभर टक्के मतदान व्हावे यासाठी मतदार जागृती मोहिमेंतर्गत गुरुवारी (दि.२१) सहविचार सभेचे आयोजन यशवंत कॉलेज, नांदेड येथे सकाळी १०.३० वाजता करण्यात आलेले आहे. शहरातील सर्व महाविद्यालयातील एनएसएस प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहविचार सभेत उपस्थित रहावे, असे आवाहन मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी गणेश देशमुख यांनी केले.

दै. लोकमत ⑤




निवडणूक : मतदारांना आकर्षित मनपाच्या वतीने ठिकठिकाणी फलक लावण्यात आले आहे.